अत्यंत महत्वाचे/तात्काळ

# मुंबई विद्यापीठ

दुरध्वनी क्र. ०२२-२२७० ८७३८
०२२-२२६१ ८९८७
Email : supt.statunit@gmail.com

सांख्यिकी कक्ष
खोली क्र २०२, दुसरा मजला,
मुंबई विद्यापीठ, फोर्ट आवार,
महात्मा गांधी मार्ग,
मुंबई - ४०० ०३२.

**No. UDSTAT/ICD/2018-19/ 132 of 2019**

दिनांक : २४ जानेवारी, २०१९.

**परिपत्रक :-**

**विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विषयाची माहिती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्यासाठी आपली माहिती सादर करणेबाबत.....**

**संदर्भ : क्र. युएनआय/६०/१८/अधी.३/विशि १/२७९ दिनांक ८ जानेवारी, २०१९.**

---

महोदय/महोदया,

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य, विद्यापीठ विभाग व कक्ष प्रमुख/संचालक यांना उपरोक्त विषयांकित संदर्भास अनुसरून निदर्शनास आणुन देऊ इच्छितो की, वरीष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय (उ.शि.), महाराष्ट्र राज्य, पुणे, यांच्या उल्लेखित पत्रानुसार शैक्षणिक वर्षे २०१७-१८ या कालावधितील उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व विषयाची माहिती पुस्तक रूपाने प्रकाशित करण्याच्या हेतूने कळविलेले आहे.

तरी आपल्या विभागाशी संबंधित असलेली व संचालनालयाच्या विवरण पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे महत्वपुर्ण व अचुक माहिती त्वरीत नोडल अधिकारी/अधिक्षक (AISHE/MIS CELL), सांख्यिकी कक्ष, दुसरा मजला, खोली क्र. २०२ (supt.statunit@gmail.com) येथे Email व Hard Copy व्दारे आपल्या सही व शिक्क्यासह बुधवार, दिनांक ३० जानेवारी, २०१९ पर्यत पाठविण्याची व्यवस्था करावी, जेणेकरून संचालनालयास सदरची महत्वपूर्ण असलेली माहिती शासनास विनाविलंब व अडथळा न येता सादर करणे सोईस्कर होईल.

उपरोल्लेखित संदर्भित बाब लक्षात घेता, आपणास पूनःश्च ज्ञात करण्यात येते की, संचालनालयाच्या व मा. कुलगुरूंच्या आदेशानुसार विवरण पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे आपल्या विभागाची महत्वपुर्ण अचूक माहिती विनाविलंब सादर करणे अनिवार्य आहे, अन्यथा आपण विभाग प्रमुख या नात्याने सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल, याची आपल्या स्तरावर योग्य ती दखल घ्यावी.

टिप : सोबत जोडलेले विवरण पत्र आपल्या ईमेलवर पाठविण्यात येत आहे, त्याप्रमाणे सदरची माहिती त्वरीत भरण्यात यावी.

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रति,
सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य
विद्यापीठ विभाग व कक्ष प्रमुख आणि
अध्यासन व केंद्र यांचे संचालक